# WOMEN EMPOWERMENT:

## Role in Social Science

**Chief Editor**

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. C.B. Satpute

Dr. S.U. Kalme

Mr. K.B. Giri

ISBN No. 978-93-83995-66-1

Anuradha Publications, Nanded

# Women Empowerment: Role in Social Science

**Chief Editor**
Dr. S.V. Kshirsagar
Dr. S.B. Donge
Dr. S.U. Kalme
Mr. K.B. Giri

**ISBN No.** 978-93-83995-66-1

**Published by:**

Anuradha Publications

Cidco-Nanded

**Publication Year:** 2019-20

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**

Gurukrupa Offset,

Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**

Simran Computers

Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**

Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS


| Sr. No. | Content |
|---|---|
| 01 | स्त्री तत्त्वज्ञ : संत जनाबाई<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 02 | परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास<br>डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे |
| 03 | भारतातील महिला सक्षमीकरणाची वास्तव व गरज एक अभ्यास<br>डॉ. दर्शना साहेबराव कानवटे, प्रा.डॉ.दयानंद उजळंबे |
| 04 | आदिम धर्म अस्तित्व आणि आव्हाने<br>प्रा. राजेश धनचकर |
| 05 | Representation of Social Reality in the Play 'Silence! The Court Is In Session` of Vijay Tendulkar<br>Mr. Kailas B. Giri |
| 06 | महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान.<br>प्रा.डा. दिपमाला विशनाथ रायठक |
| 07 | घुमंतू बंजारा समाज की संस्कृति<br>प्रा.डॉ. महावीर रामजी हाके |
| 08 | Portrayal of Caste Discrimination in the Works of Mahatma Phule<br>Mr .Kailas B Giri |
| 09 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील समाजजीवन<br>डॉ. राजेश धनजकर |
| 10 | स्त्री-सक्षमीकरणाच्या विविध योजना<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 11 | गोदाकाठची भक्तिगंगा संत जनाबाई<br>प्रा.राजेश भालेराव |


ISBN No. 978-93-83995-66-1 Anuradha Publications, Nanded

# परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास

*डॉ. व्ही. एस. चिमनगुंडे,*
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गंगाखेड जि. परभणी

**सारांश:**

एखाद्या प्रदेशातील लोकसंख्या वितरणाचा अभ्यास करत असताना अनुसूचित जातीमधील लोकसंख्या या घटकाचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. कारण प्रदेशातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास या घटकाशिवाय परिपूर्ण होत नाही. त्यामुळे अनुसूचित जाती मधील लोकसंख्येच्या वितरण कशाप्रकारे झालेले आहे हे लक्षात येते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थिती अभ्यासत असताना अनुसूचित जातीमधील लोकसंख्या प्रमाण कसे आहे हे पाहणे गरजेचे असते. भारतीय जनगणना तयार करत असताना अनुसूचित जाती व जमाती यांची जनगणना वेगळी केली जाते. कारण भारताच्या मागासलेल्या लोकसंख्येमध्ये या जाती व जमातीतील लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे यांचे सामाजिक स्थिती अभ्यासण्यासाठी व सुधार करण्यासाठी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा अभ्यास करणे गरजेचे असते.

**बीजसंज्ञा:** लोकसंख्या, अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे मंडळनिहाय वितरण.

**प्रस्तावना :**

लोकसंख्या संसाधनांच्या अभ्यासात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे वितरण व वृद्धी या दोन घटकांना अतिशय महत्त्व आहे. कारण अनुसूचित जातीचे लोक आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांच्या मालकीची उत्पादनाची फारशी साधने नाहीत त्यामुळे परळी तालुक्यातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. महार मांग चांभार ढोर भंगी या अनुसूचित जातींच्या लोकांचे वास्तव्य परळी तालुक्यात आहे. त्यांचे एकूण लोकसंख्येची प्रमाण विकास सामाजिक स्थिती अभ्यासली गेली आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

परळी तालुका मध्यआहे पूर्वेस जिल्ह्याच्या बीड आणि महाराष्ट्रात पूर्व-.परळी तालुका 18 41'33" उत्तर अक्षांश ते 19 7'46" उत्तर अक्षांश आणि 76 14'27" पूर्व रेखांश ते 76 41'44" पूर्व रेखावृत्त दरम्यान विस्तारलेला आहे. परळी तालुक्याच्या दक्षिणपूर्व गंगाखेड तालुका तसेच पूर्वेस सोनपेठ व पाथरी तालुक्याच्या सीमा आहेत. तर परळी तालुक्याच्या दक्षिण पश्चिमेस अंबाजोगाई तर उत्तर दिशेस माजलगाव आणि पश्चिमेला धारुर तालुक्याचा सीमा आहेत. परळी तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 737.99 चौ.की.मी.आहे. त्यामध्ये 105 ग्रामीण वस्ती 1 नागरी केंद्र व 5 मंडळाचा समावेश आहे.

**उद्दिष्टे :**

1} परळी तालुक्यातील अनुसूचित जातीमधील लोकसंख्या वितरणाचा अभ्यास करणे.

2} परळी तालुक्यातील अनुसूचित जातीमधील लोकसंख्या वितरणाचा मंडळ निहाय अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व आधार सामग्री संकलन :**

परळी तालुक्यातील साक्षरतेचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या आधार सामग्रीचा वापर केला आहे. दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीसाठी बीड जिल्ह्याचा जनगणना अहवाल सन २००१ व २०११ यातून माहिती संकलित केली आहे.


**विषय विवेचन :**

परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येविषयी अभ्यास करताना परळी तालुक्यात २००१ मध्ये ३३७५१ एवढी लोकसंख्या अनुसूचित जातीची होती. तर त्यामध्ये वाढ होऊन २०११ मध्ये ४६९९० इतकी लोकसंख्या झाली. अभ्यास क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा मंडळ निहाय अभ्यास केला असता परळी मंडळात शहरी व ग्रामीण लोकसंख्या मिळून २००१ मध्ये सर्वात जास्त १७२८६ इतकी लोकसंख्या होती. २०११ च्या जनगणनेनुसार परळी मंडळात अनुसूचित जातीची लोकसंख्या ही २१२१४ एवढी आहे. २००१ व २०११ या दोन जनगणनेनुसार अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा अभ्यास केला असता लोकसंख्येमध्ये वाढ मोठ्या प्रमाणात झालेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत मंडळ निहाय बदल झालेला आढळून येतो. परळी मंडळात २१२१४ सिरसाळा मंडळात ९९६२ नागपूर ५७९२ पिंपळगाव मंडळात ५२५६ तर धर्मपुरी मंडळात ४७६६ इतकी लोकसंख्या आहे.

**अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय अनुसूचित जातीची लोकसंख्या**

| अ.क्र | महसूल मंडल | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| १ | सिरसाळा | ५१९६ | ९९६२ |
| २ | पिंपळगाव (गाढे) | ३८५७ | ५२५६ |
| ३ | नागापूर | ४२५२ | ५७९२ |
| ४ | परळी | १७२८६ | २१२१४ |
| ५ | धर्मापूरी | ३१६० | ४७६६ |
| | एकूण तालुका | ३३७५१ | ४६९९० |

***साधनसामग्री*** : बीड जिल्ह्याचा जनगणना अहवाल सन *२००१ –२०११*




**निष्कर्ष :**

१) देश,राज्य,जिल्हा यांच्या तुलनेत परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे.

२) अभ्यास क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक रचनेचा परिणाम झालेला दिसून येतो

३) परळी नागरी भाग वगळता सिरसाळा मंडळात अनुसूचित जातीची लोकसंख्या अधिक आहे.

४) परळी मंडळात सर्वाधिक अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे.

**संदर्भ :**

१) भारतीय जनगणना अहवाल, २००१ आणि २०११

२) ए.बी.सवदी प्रा.कोळेकर पी.एस. मानवी व लोकसंख्या भूगोल, निराली प्रकाशन, पुणे, १९९९

३) सामाजिक आणि आर्थिक समालोचन २००१-२०११

४) Ghosh B.N ' Fundamental of population Geography'

५) www.beedgov.in

*******